Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 2
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# रशिया - युक्रेन युद्ध कारणे आणि परिणाम

**प्रा. डॉ. आर. एस. पवार,** असोसिएट प्रोफेसर, संरक्षणशास्त्र विभाग आर. सी. पटेल महाविद्यालय
शिरपूर जि. धुळे

## परिचय

रशिया आणि युक्रेन यांच्यात फेब्रुवारी २०२२ पासून युद्ध सुरू आहे. रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी २४ फेब्रुवारी २०२२ रोजी युद्धाची घोषणा केली होती. रशिया-युक्रेन युध्द आणि आनुषंगिक आर्थिक निर्बंधाचा नकारात्मक परिणाम जागतिक पातळीवर अमेरिकेने युरोपियन राष्ट्रांच्या मदतीने रशियावर नको तेवढे निर्बंध लावले परिणाम रशिया-युक्रेन युध्दात झाला. युक्रेनचे राष्ट्रध्यक्ष झेंलेन्स्की यांनी आपल्या भैागोलिक स्थितीचा फायदा घेत अमेरिकेला नाटोचे सदस्य बनवण्याची मागणी केली.यावरून पुतीन चिडले कारण युक्रेनच्या सीमा रशियाला मिळतात. नाटो देशांमध्ये एक करार आहे कि NATO च्या कोणत्याही एका देशावर हल्ला झाला तर NATO च्या सर्व सदस्यांनी त्याला स्वता:वर केलेला हल्ला समजला जाईल आणि लष्करी सामर्थ्याने तो परतून लावेल नाटोमध्ये सध्या ३० देश आहेत अमेरिकेने नाटोच्या माध्यमाने रशियाला वेढा घातला. परिणामी रशियाने फेब्रुवारी २०२२ मध्ये युक्रेनवर आक्रमण करून आपल्या सीमारेषा शेजारील युक्रेनच्या प्रदेशांवर ताबा मिळविण्याचा प्रयत्न गेली वर्षभर सुरु आहे.युक्रेनच्या लष्करी कार्यवाहीचे नियोजन आणि संचालन करण्यासाठी युक्रेनला पाठींबा आणि मदत देण्याबाबतची पाश्चात्य रणनीती उत्तर अटलांटिक संस्थेचा इतर सिमावर्ती राष्टरांवर मजबूत पवित्रा आणि रशिया विरुध्द  व्यापक बहुराष्ट्रीय आर्थिक निर्बंध यामुळे रशिया आणि युक्रेन पुरस्कुत अमेरिका यांच्यातील कठोरता अधिक विनाशाकडे जाण्याची भीती जगभर निर्माण झाली.रशिया-युक्रेन युध्द आर्थिक निर्बंध याचा नकारात्मक परिणाम जगातील विविध भागात दिसून आला.ज्यामुळे एक वेगळी आव्हाने वाढली आहेत. अमेरिकेच्या निर्बंधाना नाटो सदस्यांनीच नाकारल्याने जागतिक मत विभागले गेले आहे.आर्थिक निर्बंधाच्या अनपेक्षित परिणामांचा आफ्रिका,आशिया,आणि लँटिन अमेरिकेतील आर्थिक दृष्ट्या कमी प्रगत देश आणि विकसनशील देशांकरिता मुत्सधी उपाय योजण्याची संसाधनीय अर्थव्यवस्था धोक्यात गेली आहे. युक्रेन ही जगातील अनेक देशांची ग्रँनरी आहे युक्रेन,रशिया,कझाकीस्थान,आणि रोमानिया यासारख्या देशातील गहू निर्यात करण्यासाठी रशियन ब्लँक सी हे सर्वात मोठे पोर्ट आहे हे युध्दामुळे रशियन बंदरातून बाहेर पडणाऱ्या सर्व उत्पादांवर मंजुरीचे नवीन नियमाने  जगात आर्थिक मंदी येण्याची भीती  अंतराष्ट्रीय अभ्यासकांनी वर्तवली आहे.तिसऱ्या महायुद्धाची नांदी ठरत असलेल्या रशियन आक्रमणाने जगाची झोप उडवली आहे.मुळात रशियाला युक्रेनवर कब्जा करण्यास कसलेही स्वारस्य नसले तरी त्याने नाटो मध्ये सहभागी होवू नये हीच मुख्य अट आहे जी युक्रेनला मान्य नाही.या एकमेव कारणासाठी सध्या जगात अणूयुध्द होण्याची भीती निर्माण झाली आहे.”

## उद्देश

१. रशिया-युक्रेन युध्दाची पार्श्वभूमी समजून घेणे.
२. रशिया-युक्रेन युध्दाची कारणे अभ्यासणे.
३. रशिया-युक्रेन युध्दाचे जागतिक परिणामांचा अभ्यास करणे.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

४. रशिया-युक्रेन युध्द आणि जागतिक राजकारणातील प्रभाव याचा चिकित्सक अभ्यास करणे.

**गृहीतके**

१. युक्रेन नाटोचा सदस्य होवू नये म्हणून रशिया-युक्रेन युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली.
२. नाटो राष्ट्रांचा इतर सीमावर्ती देशांवर मजबूत पवित्रा रशिया विरुध्द आर्थिक निर्बंधांमुळे दोन देशात संघर्ष होण्याची परिस्थिती निर्माण झाली.
३. रशियासह काही पाश्चत देश ब्लॅंक सी मधून जगाला तेल आणि खाध्यान्न पुरवठा करतात. ही पुरवठा साखळी तोडणे अमेरिकेची प्राथमिकता दिसते.
४. लष्करी संघठन, शस्त्रस्पर्धा व वर्चस्ववाद मुळे जगावर युद्धाचे संकट ओढवले.

**मुख्य शब्द**

प्रस्तुत अध्ययनात अतिशय विशेष मुख्यशब्द “रशिया-युकेन युध्द, नाटो संघठना, ब्लॉंक सी, पाश्चिमात्य देश अमेरिका भारत चीन देशांची भूमिका युद्धाची व्याप्ती कारणे परिणाम आर्थिक निर्बंध नैसर्गिक संसाधने, खनिजे, भू-राजकीय अस्थिरता, जागतिक मंदी,

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत शोध अध्ययन मध्ये रशिया-युक्रेन युध्द त्याचा जागतिक राजकारणावर झालेला प्रभाव कारणे परिणाम एक अभ्यास लेखन विस्तार करिता प्रथम ,दुय्यम साहित्य साधनांचा टेलिव्हिजन मेडिया वरील सामरिकी लष्करीदृष्ट्या विश्लेष्णत्मक चर्चा विषयतज्ञांची मते संदर्भ विषय विवेचन विश्लेषणात्मक व वर्णनात्मक स्वरुपात केले आहे.की ज्यातून सहज अध्ययन करता येईल.

**संशोधन पूर्व साहित्याचा आढावा**

प्रस्तुत शोध अध्ययनात रशिया-युक्रेन युध्दाचा जागतिक राजकारणावर झालेला प्रभाव कारणे परिणाम एक अभ्यास यात २२ फेब्रुवारी २०२२ रोजी पूर्व युक्रेन मधील फुटीरतावाद्यांचे डोनेस्तक व लुहान्स्क प्रदेशांवर नियंत्रण असल्याचे कारण देत रशियाने युक्रेंनवर आक्रमण केले. युध्दापूर्वी अफगाण मधील सत्तांतर, सिरीया विवाद, चीनचा विस्तारवाद, पश्चिमी राष्ट्रांचा अमेरिकेचे वर्चस्व असलेल्या नाटो संस्थेमध्ये ३० देशांचा समावेश आहे. त्यापैकी बहुतेक युरोपीय आहेत अनेक मार्गांनी रशिया वर आर्थिक निर्बंध लावले जगात या विषयावर आंतराष्ट्रीय राजकीय सामजिक लष्करी विचारवंतानी सुरु असलेल्या रशिया-युक्रेन युध्द झेलेन्स्की च्या विचारांवर अमेरिकेचा प्रभाव आणि पुतीन यांना आपल्या शेजारी शत्रू राष्ट्रांचा ताबा नको असल्याने युक्रेन बेचिराख झाला. डॉ.अनिश भसीन यांनी आपल्या अंतराष्ट्रीय संघठन या ग्रंथात नाटोचा विस्तारवादी दृष्टीकोण अमेरिकेचा जागतिक वर्चस्ववाद या साऱ्या बाबींचा उल्लेख करण्यात आला आहे .मेजर जनरल (निवृत्त) जे.डी.बक्षी यांनी आपल्या “The Rashiya ukren war lessons learnt is out” या ग्रंथात अमेरिकेचा रशिया विरुध्दचा अजेंडा आणि नाटोच्या नावाखाली पूर्व युरोपमध्ये रशियाचा व्यापार संपविणे जगावर एकाधिकार निर्माण करून रशिया व चीनची जागतिक ताकद कमी करणे अमेरिकेचा स्पष्ट उद्देश आहे.याशिवाय लष्करी,राजकिय विचारवंतानी मेडिया वर सामरिक चर्चा ज्यातून G-7 सारख्या गटाने अमेरिका आणि युरोपियन युनियनच्या निर्बंधाना पूर्ण समर्थन दिले आहे युक्रेन आणि रशिया दरम्यानच्या कोणत्याही संभाव्य संघर्षाचा अर्थ असा की पाश्चिमात्य अधिक शक्तिशाली


Copyright © | JET Network, All Rights Reserved

बनतील तिसऱ्या महायुद्धाचा आण्विक धोका जगाला भेडसावत आहे.वरील शोधलेख पूर्णपणे नवा असून रशिय-युक्रेन युध्द संपवून जगाला शांततेचा मार्ग कसा शोधता येईल.शियाय या युद्धाला मेडियावार देखील संबोधले गेले यासर्व घटनांचा अभ्यास प्रस्तुत अध्ययनात केला जाणार आहे.युरोपियन सेक्रेटरी कामिल झोलाँस्की यांनी आपले मत मांडताना युक्रेनने अमेरिके सोबत जावू नये कारण युक्रेनच्या मातीतूनच रशियाचा पाया रचला गेला रशियाची ओळख उरल पर्वतरांग ही युक्रेन मधून जाते अमेरिका व रशिया वाद अनेक वर्षांचा आहे १९९१ पर्यंत सर्व घटक राज्य सोवियत युनियन नावाने ओळखले जात होते परंतु शीतयुध्द काळातील संघर्ष सोवियत युनियनची १५ घटक राज्यात शखले उडवण्यात आणि जगात एकमेव महासत्ता एकाधिकार राखण्यात अमेरिका यशस्वी झाली. युक्रेनियन सैन्याने असे म्हटले आहे की रशियाने ताब्यात घेतलेला प्रदेश परत घेण्याची क्षमता त्यांच्याकडे आहे, परंतु त्यासाठी त्यांना अधिक शस्त्रे आवश्यक आहेतयुक्रेनला अद्ययावत हवाई संरक्षण प्रणाली आणि लष्करी उपकरणांची तरतूद पुढे ढकलणे ., जे युक्रेनियन प्रदेशांच्या मुक्ततेला गती देऊ शकते, यामुळे युक्रेनियन शहरे आणि गावांचा आणखी नाश होतो, नागरिकांच्या मृत्यूत वाढ होते आणि युद्ध सुरू होते.

पाश्चात्य भागीदार युक्रेनला नवीन प्रकारची शस्त्रे पुरविण्याबाबत सावध आहेत, रशियन अधिकाऱ्यांकडून आणखी मोठ्या प्रमाणात वाढ होण्याच्या आणि अण्वस्त्रांचा वापर करण्याच्या सततच्या धमक्या लक्षात घेऊनयुक्रेनियन अधिकाऱ्यांची रशियाच्या अटींवर वाटाघाटीच्या टेबलावर बसण्याची . अनिच्छा आणि युद्धभूमीवर युक्रेनियन सैन्याचे यश रशियन अधिकाऱ्यांना त्यांच्या अटींवर शांततेसाठी ब्लॅकमेल आणि जबरदस्ती करण्याच्या्या नवीन पद्धती शोधण्यास प्रवृत्त करते.

**रशिया - युक्रेन युद्धाची वैशिष्टे-**

१. रशियाने युक्रेनवर आक्रमण करण्यापूर्वी डोनेस्तक आणि लुहान्स्क या फुटीरतावादी प्रदेशांचे स्वातंत्र्य ओळखले होते.
२. रशियाने क्रिमिया ताब्यात घेतला आणि तो आपल्यात समाविष्ट केला होता.
३. रशियाने युक्रेनियन सैन्याशी लढणाऱ्या रशिया समर्थक फुटीरतावाद्यांना पाठिंबा दिला होता.
४. रशियाने लांब पल्ल्याच्या क्षेपणास्त्रांनी युक्रेनवर हल्ला केला होता.
५. युक्रेनने रशियाने व्यापलेल्या आपल्या प्रदेशांचा काही भाग परत मिळवण्यात यश मिळविले आहे.

**युद्धाची कारणे**

रशिया-युक्रेन युध्द आता एका वेगळ्या वळणावर आलेले दिसते तिसरे महायुध्द आणि अणुबॉम्बचा वापर याचा उच्चार युध्द सुरु झाल्यापसून पूर्व-पश्चिम मेडिया, विचारवंत सामरिक तत्ववेंते अमेरिका ब्रिटन पोलंड सह अनेक राष्ट्र रशिया विरुध्द उभे ठाकले या युध्दामागे नाटो मुख्य कारणीभूत मानला जातो.NATO म्हणजे “North Atlantic Treaty Organization”ज्याची सुरुवात १९४९ ला झाली.युक्रेनला नाटो मध्ये सहभागी व्हायचे आहे परंतु रशियाचा विरोध आहे विरोध असण्यामागे काय कारणे आहेत तीच युद्धाची कारणे देखील आहेत एकेकाळी सोवियत युनियनचा भाग असलेला युक्रेन एवढा शत्रू का झाला याचे कारण नाटोमध्ये युक्रेनचा समावेश करण्यासाठी अमेरिकेने रशियाच्या सरहद्दीवर आपली लष्करी शक्ती उभी करायची आहे आणि रशिया हे मुळीच खपवून घेणार नाही कारण रशियाची सुरक्षितता धोक्यात येवू शकते. अध्यक्ष पुतीन यांच्या बोलण्यावरून रशियाच्या सुरक्षेकरिता प्रसंगी अणुयुद्धाचा प्रयोग करू असे उद्गार वारंवार केले आहेत आणि तेवढ्याच ताकदीने अमेरिकन अध्यक्ष जो


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 2
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

बायडन यांनी रशिया पासून जगाला कसा धोका आहे हे युक्रेनला लष्करी मदत पोलंड मार्गे देवून या युद्धाची दिशा एका वेगळ्या वळणावर जाताना दिसते.दुसरे कारण म्हणजे युएस आणि वेस्टर्न युरोपियन देशांनी नॉर्ड स्ट्रीम-२ रोखलेली पाईपलाईन हे आहे या प्रकल्पावर रशियाने अब्जावधी डॉलर खर्च केले आहेत यातून रशियाला फ्रांस जर्मनी सह संपूर्ण युरोपला गॅस व तेलाचा पुरवठा करायचा आहे.तिसरे कारण म्हणजे युक्रेनशी भावनिक नाते जुळले आहे रशिया विरुध्द अनेक वेळा युक्रेन मध्ये बंड पुकारले गेले ही युद्धामागील कारणे आहेत.

**अंतरराष्ट्रीय राजकारण**

रशिया-युक्रेन युद्धाचा जगावर आर्थिक,सामाजिक राजकीय व् सामरिक परिणाम होतील युरोपियन देशांची उर्जेची गरज रशियावर अवलंबून आहे ३०% कच्चे तेल,३५% नैसर्गिक वायू ची आयात रशियाकडून होते युरोपवर उर्जा संकट येणार शिवाय या देशांची इकानॉमी एकमेकांवर अवलंबून आहे त्याचा परिणाम संपूर्ण जगावर होईल.भारत रशियाकडून मोठ्या प्रमाणात लष्करी उपकरणांची आयात करतो अमेरिकेने सांगितल्याप्रमाणे रशियावर निर्बंध लादले तर भारताच्या लष्करी आधुनिकीकरणावर मोठा परिणाम होईल याचा सर्व फायदा चीन ला होईल सध्या या युद्धात चीन रशियाच्या बाजूने आहे शियाय रशियाला इंडो पॅसिफिक मध्ये आपला एकमेव सहकारी समजतो रशिया युक्रेन वाद शांततेच्या मार्गाने सुटावा अशी भारताची भूमिका आहे कारण अलीकडील अमेरिका-भारत सबंध रशियाशी मैत्री अश्या दुहेरी संकटात भारत सापडलेला आहे हा वाद युनोच्या मध्यस्थीने सुटावा हीच जागतिक सुरक्षा व शांततेसाठी महत्वाचे आहे आधीच अडचणीत असलेल्या व ताणलेल्या जागतिक पुरवठा व्यवस्थेत आणखी व्यत्यय येण्याची भीती आहे.रशिया-युक्रेन युद्धाने संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेतले आहे जग तिसऱ्या महायुद्धाच्या दिशेने जातय की काय अशी अनेक देशांनी भीती व्यक्त केली रशिया सारख्या बलाढ्य राष्ट्राच्या लष्करी हल्ल्याला एकटा युक्रेन तोंड देवू शकत नाही परिणामी रशिया युक्रेनमध्ये वेगाने सामरिक आणि लष्करी यश मिळवत आहे. युरोप मधील सर्वात मोठ्या अणुप्रकल्पावर रशियाने ताबा मिळविला या दोन देशांमध्ये वाटाघाटींच्या चर्चेच्या फेरीत संघर्षाचा तोडगा काढणे कठीण आहे कारण हा संघर्ष फक्त रशिया-युक्रेन पुरता मर्यादित नसून जागतिक व्यवस्थेत सुरु असलेल्या मुलभूत स्थित्यांतराचा एक भाग आहे.१९९१ नंतरची अंन्तराष्ट्रीय व्यवस्था ही अमेरिकेची एकधृवियता आणि पाश्च्यात उदारमतवादी विचारांच्या प्रसाराने परिभाषित सोवियत संघाचे विघटन हे कम्युनिस्ट एकाधिकारशाहीचा पराभव आणि पाश्च्यात उदारमतवादी लोकशाहीचा विजय म्हणून समजले गेले.आपल्यातून प्रजासत्ताक झालेले अँस्टोनिया,लँटव्हिया,लिथुएनिया सारख्या देशांनी थेट नाटो मध्ये प्रवेश केला.युरोप नाटोचा विस्तार अमेरिकन एकध्रुवीयतेणे सुनिश्चित केला २००८ चे जागतिक आर्थिक संकट ,अमेरिकेचे ढासळते वर्चस्व आणि एक प्रमुख शक्ती म्हणून चीन चा उदय या कारणांनी जागतिक व्यवस्था बदलण्यास सुरुवात झाली. रशियाचा संथ उदयाचे संकेत नाटोमध्ये जॉर्जियाच्या समावेशास रशियाचा तीव्र विरोध रशियन राजकारणात पुतीन यांचा उदय व सिरियातील गृह युद्धात वर्चस्व,येमेन युद्ध,क्रीमिया विलीनीकरण या साऱ्या घटना रशियाच्या उद्याने जागतिक शक्तीसंतुलनाचे बदलते स्वरूप युक्रेन युद्धात समजते. कारण महासत्तेचे परस्परविरोधी हित आणि निर्माण होणाऱ्या महासत्तेचे राजकारण यात युक्रेन बळी ठरत आहे.बदलत्या भूराजकीय परिस्थिती आणि परिणामी जागतिक सत्ता संतुलनात होणाऱ्या बदलाचा एक मोठा संकेत आहे ही नव्याने शीतयुद्धाची सुरुवात आहे का


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 2
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

आज जरी खात्रीने सांगता येत नसले तरी समकालीन अंतराष्ट्रीय सबंधाची दिशा बदलणारा एक निर्णायक काळ आहे असे म्हणता येईल.

**जागतिक परिणाम**

युक्रेन आणि रशिया दरम्यान कोणताही संघर्षाचा अर्थ पाश्चिमात्य ची शक्ती डॉलर ला पर्याय शोधणे महाशक्तीचे एकधृवीय जागतिक वर्चस्व आंतरराष्ट्रीय व्यवहारात वापरण्यासाठीचे चलन म्हणून अमेरिकी डॉलर चे वर्चस्व आक्रमक निर्बंधांना सुलभ करते आणि बहुतेक देशांसाठी चलन अवमूल्यनाचे संभाव्य फायदे थांबवते हा चिंतेचा विषय आहे परिणामी जगात प्रादेशिक व्यापार करिता पर्यायी चलनाचा विचार हि अमेरिकेची चिंता वाढवणारी आणि ब्रिक्स राष्ट्रांशी व्यवहार व व्यापार करणाऱ्या देशांसाठी हा पर्याय उपयुक्त असल्याचे सुचवले जात आहे आणि अमेरिकेला डॉलरला पर्याय नको आहे हि सध्याची राजकीय स्थित्यंतरे आहेत साथीच्या रोगाने प्रभावित झालेली जागतिक अर्थव्यवस्था युक्रेन युद्धाने अधिक प्रभावित झाली आहे.रशिया-युक्रेन युद्धाचा पाच क्षेत्रांवर मोठा परिणाम होईल. अनेक युरोपियन देश रशियन उर्जेवर अवलंबून आहेत अनेक महत्वाच्या पाईपलाईन रशिया युक्रेन मधून आहेत शियाय SWIFT मधून रशियाला काढून टाकण्यास युरोप नाखूष आहे. नैसर्गिक वायूचा पुरवठा करण्यात रशियाचा मोठा वाटा आहे गॅस हे अनेक पुरवठा साखळयांसाठी आवश्यक इनपुट असल्याने मुलभूत पुरवठ्यातील व्यत्येय आर्थिकदृष्ट्या घातक ठरतील. जागतिक वाहतूक व्यवस्था महासागरातील जहाजांची वाहतूक काळ्या समुद्रातील वाहतूक जागतिक स्तरावर ओडेसा हे सर्वात मोठे कन्टेनर टर्मिनलपैकी एक आहे जर रशियन सैन्याने याचा संपर्क कापला युक्रेनियन आयात आणि निर्यातीवर खूप गम्भीर परिणाम होतील . रशिया युक्रेन निकेल ,तांबे आणि लोह या धातूंच्या जागतिक उत्पादनात आघाडीवर आहेत निऑन,पॅलेडीयम आणि प्लॉटीनियम सारख्या आवश्यक कच्चा मालाच्या निर्यात व उत्पादनातही ते मोठ्याप्रमाणवर गुंतलेले आहेत रशियावर निर्बंधांमुळे या धातूंच्या किमंती वाढलेल्या आहेत मायाक्रोचीप्सला लागणारा निऑन ९०% रशियामध्ये आहे म्हणून अमेरिका सहित नाटो गटाची धमकी पोकळ आहे.रशिया व अमेरिका या दोघांकडे आण्विक शस्त्रे किमान आठ हजार पेक्षा अधिक आहे युध्द थांबले नाही तर युक्रेन बाबत आपण केलेल्या कृतींमध्ये कुणीही हस्तक्षेप केल्यास त्याला इतिहासात कधीही पहिले नसतील असे परिणाम भोगावे लागतील असा इशारा पुतीन यांनी इतर राष्ट्रांना दिला आहे.

**निष्कर्ष**

रशिया सध्या आपल्या ताब्यात असलेल्या प्रदेशांमधील संघर्ष गोठवण्यासाठी आणि दुसऱ्या मोठ्या प्रमाणात स्ट्राइकची तयारी करण्यासाठी वेळ मिळविण्यासाठी अल्पकालीन युद्धविराम शोधत आहे. , विशेषतः, कीव काबीज करण्याचा दुसरा प्रयत्न होण्याची शक्यता. रशियाने युक्रेनवर लादलेले युध्द म्हणजे नाटोच्या अपेक्षित विस्ताराच्या पार्श्वभूमीवर लष्करी कार्यवाही आपले वर्चस्व सिद्ध करण्यासाठी घेतलेला निर्णय आहे.युक्रेनचे नाटोचे संभाव्य सदस्यत्व रोखायचे पण त्याहीपेक्षा महत्वाचे म्हणजे विघटनानंतर गमावलेले प्रादेशिक वर्चस्व स्थापित करण्याच्या दृष्टीने वाटचाल आणि रशिया आंतराष्ट्रीय घडामोडींमध्ये एक सत्ता म्हणून उदयास येत आहे हे स्थापित करणे युक्रेनमधील रशियन आक्रमणास लष्करी प्रतिसाद देण्यास पाश्च्यात राष्ट्रांच्या अक्षमता शिवाय युरोपमध्ये पाश्च्यात्यांना मर्यादा आहेत नाटोत सामील होणे युक्रेनला शक्य नाही कारण प्रादेशिक भूराजकीय परिस्थिती प्रतिस्पर्धेत युक्रेन एकटा सापडला आहे. तसेच अनेक वर्षापासून घसरत चाललेल्या रशिया बरोबरच्या सबंधामुळे आता पाश्चिमात्य देश आणि रशिया


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 2

Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

यांच्यात परस्परांवर विश्वास कमी झाला आहे त्यातच रशिया-युक्रेन संघर्षाची व्याप्ती वाढतच आहे अशावेळी जग पुन्हा दोन गटांमध्ये विभागले जावू शकते असा अंदाज व्यक्त होत आहे अमेरिका सह युरोपियन देशांनी उघडपणे युक्रेनची बाजू घेतली आहे तर रशिया बरोबर चीन,क्रोएशिया,पाकिस्तान,बेलारूस,आणि भारत हे सोबत आहेत.सोवियत रशिया अफगाणमध्ये जसा अमेरिकेच्या जाळ्यात येवून फसला होता तसाच याही वेळी रशिया युक्रेनमध्ये सैन्य पाठवून फसला आहे यामागेही अमेरिकाच आहे.हे जगाने ओळखले पाहिजे आणि अखिल मानव जातीला आर्थिक मंदी आणि तिसरे परमाणु युध्द यापासून वाचविले पाहिजे. रशिया-युक्रेन मधील वाद नाटो,युक्रेन रशिया यांनी राजनयाव्दारे सोडवावा हेच जागतिक सुरक्षा व शांततेसाठी गरजेचे आहे.

**समारोप**

युद्धातील पराभवाची संभाव्यता रशियन अधिकारी आणि पुतिन यांच्यासाठी वैयक्तिकरित्या एक गंभीर आव्हान बनते आणि रशियामध्येच अनपेक्षित परिणाम होऊ शकतात. गेल्या फेब्रुवारी २०२२ पासून सुरु असलेल्या रशिया–युक्रेन युध्द हा शांततेसाठी मार्ग कधीही असू शकत नाही युद्धाचे संहारक आणि मानवजातीवर विपरीत परिणाम होतात हे पहिल्या व दुसऱ्या महायुद्धानंतर जगाने अनुभवले आहे. रशिया–युक्रेन युद्धाची दाहकता ही जागतिक स्थितीवर दिसून येत आहे.आंतराष्ट्रीय व्यापारात १.५ व आर्थिक व्यवस्था १ टक्क्यांनी कमी झाली जागतिक बँक,आणि आयएमएफ ने जागतिक मंदीचा इशारा दिला आहे युद्धामुळे अन्नधान्न व तेलाच्या किंमती मध्ये मोठी वाढ होत आहे विकसनशील व गरीब देशांमध्ये श्रीलंकेसारखी स्थिती निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

**संदर्भ**

१. https://www.orfonline.org/marathi/research/russia-vs-ukraine-marathi
२. भसीन अनिश, “आंतराष्ट्रीय संघठन” प्रभात प्रकाशन नई दिल्ली, जानेवारी २०१८.
३. Waslekar sandeep, “A Word without War” Harper Collins publication India, 2022.
४. Sing Ajay, “Russia Ukraine War” Pentagon press Jan.2023.
५. निबांळकर दत्ता ,धगधगते युक्रेन ... देशदूत २४ फेब्रुवारी २०२२.
६. तावडे विजय,Ukraine invasion. रशियाच्या हाती. ISTGLOBALECONOMY २५/२/२०२२.
७. परांजपे अमोल रशिया युक्रेन युद्धाबाबत, लोकसत्ता ४/१०/२०२२.
८. https://www.orfonline.org/marathi/russia-ukraine-war-economic-sanctions-and-global-headwinds/
९. https://www.mahamtb.com/Encyc/2022/4/17/article-on-effects-of-russia-ukraine-war.html
१०. https://www.orfonline.org/marathi/russia-ukraine-war-economic-sanctions-and-global-headwinds/
११. प्रा.रानडे अक्षय, “रशिया-युक्रेन युध्द आणि बदलणारी आंतराष्ट्रीय व्यवस्था” तरुण भारत ५/३/२०२२.
१२. Maj Gen (Dr.) J. D. Bakshi, The Russia Ukraine War: Lessons Learnt K. W. Publisher New Dehli 2022.
१३. https://www.loksatta.com/about/ukraine-russia-conflict


Copyright © | JET Network, All Rights Reserved